नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक १५/०९/२०२२ (गुरूवार)**

**(दुपार)**

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपी अटक

## —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण ची कारवाई :—

दिनांक १४/०९/२०२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कन्हान उपविभागात गस्त करीत असतांना पोलीस स्टेशन खापरखेडा हद्दीतील दहेगाव रंगारी येथे दिनांक १४/०९/२०२२ चे १०.०० वा. ते ११.०० वा. दरम्यान एमच—३४/एबी—३५९० क्रमांकाचा ट्रकचा चालकाला थांबवून तपासले असता सदर वाहनात चालक आरोपी क्र. १) ट्रक चालक नामे— विग्नेश उर्फे गणपत निलकठंराव कावळे, वय २२ वर्ष, रा. वार्ड नं ४ कालीमंदीर जवळ वलनी, २) ट्रक मालक विनायक बोडे रा.दहेगाव रंगारी, ३) चॉद अंसारी रा.वलनी, ४) पिवळया रंगाची जे सी बी ऑपरेटर रा.वलनी यांनी संगनमत करून त्यांच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या ४ ब्रास रेती किं. १२,०००/— रू. ची भरून वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण १५,१२,०००/—रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे सपोनि अनिल राउत स्थानिक गुन्हे शाखा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, १०९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला सुचनापत्रावर रिहा करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि मिश्रा मो.क्र. ९५११२३०८४९ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहा. पोलीस निरीक्षक अनिल राउत, पोलीस हवालदार नाना राऊत, राजू रेवतकर, पोलीस नाईक विरेन्द्र नरड, प्रणय बनाफर, आशिष मुंगल, किशोर वानखेडे, उमेश फुलबेल यांचे पथकाने केली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर